सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत
ई-शिधापत्रिका सुविधाकरिता
सेवानिहाय शुल्क निश्चीत करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र: शिवाप-२०२१/प्र.क्र.१९/नापु-२८**
मंत्रालय मुंबई-४०० ०३२
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२३.

वाचा:- नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे पत्र क्रमांक : निशि/सं.क./ का.क्र.५/ प्र.क्र.१/सु.द./२०२०/जा.१, दि. १३ जानेवारी, २०२१

**प्रस्तावना:-**

राज्यात दि.०१ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमानुसार राज्यातील ६२.३% सुमारे ७ कोटी लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळण्यास पात्र असून त्यात ७६.३ % (सुमारे ४.७० कोटी) ग्रामीण व ४५.३% (सुमारे २.३० कोटी) नागरी लोकसंख्येचा समावेश आहे. सदर अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांचे अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब लाभार्थी (PHH) अशा दोन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये (RCMS) नवीन शिधापत्रिकेसाठी अर्ज करणे, नावात दुरुस्ती, पत्ता बदल व नाव वाढविणे/कमी करणे या बाबी ऑनलाईन करुन घेण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर सुविधा तयार केली असून तपासणीअंती जनतेकरिता उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमार्फत (RCMS) राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांकरिता QR Code आधारित ई-शिधापत्रिका ऑनलाईन उपलब्ध तसेच डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर शिधापत्रिकेवर योजनेबाबत अंत्योदय अन्न शिधापत्रिका (AAY), प्राधान्य कुटुंब लाभार्थी (PHH) व राज्य योजनेंतर्गत APL Farmer, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेव्यतिरिक्त (NPH) असे नमूद करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त प्रस्तावानुसार **ई-शिधापत्रिका** सुविधाकरिता सेवानिहाय शुल्क आकारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत ऑनलाईन सेवेद्वारे ई-शिधापत्रिका सुविधाकरिता पुढीलप्रमाणे सेवानिहाय सेवा शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे / राज्य योजनेचे प्रकार | ऑनलाईन ई-शिधापत्रिकेसाठी दर ( रूपये ) |
|---|---|---|
| १ | अंत्योदय अन्न योजना (AAY) | २५ |
| २ | प्राधान्य कुटुंब योजना (PHH) | ५० |
| | APL शेतकरी | ५० |
| | राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेव्यतिरिक्त (NPH) व APL शेतकरी व्यतिरिक्त | ५० |
| ३ | APL शुभ्र | १०० |

अर्जदार यांनी शिधापत्रिकेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर प्रचलित कार्यपध्दतीनुसार तपासणी करून योजनेच्या प्रकारानुसार वरीलप्रमाणे सेवा शुल्क भरून ऑनलाईन ई-शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल. तद्नंतर ई-शिधापत्रिका डाऊनलोड करण्याकरीता नि:शुल्क डाऊनलोड सेवा देण्यात येईल.

२. ऑनलाईन ई-शिधापत्रिकेसाठी विहित केलेले सेवा शुल्क सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२३०२२२११३०३१५२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(गजानन रा. देशमुख)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री याचे सचिव
४) मुख्य सचिव यांचे सह सचिव
५) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई
७) नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
८) सर्व विभागीय आयुक्त / सर्व उप आयुक्त ( पुरवठा )
९) सर्व जिल्हाधिकारी/ सर्व अपर जिल्हाधिकारी

१०) सर्व महानगरपालिका आयुक्त,

११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

१२) मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव

१३) वित्तीय सल्लागार व उप सचिव , अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१४) सचिव (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे स्वीय सहायक

१५) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/सर्व कार्यासने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

१६) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे/सोलापूर/नागपूर

१७) सर्व मंत्रालयीन विभाग

१८) निवड नस्ती (नापु-२८).